ग्रामीण रुग्णालय गोवेली जि. ठाणे येथील अधिकारी / कर्मचारी निवासस्थान दुरुस्तीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा २०१५/प्र.क्र.३९२/आरोग्य ३(अ)
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला,ए विंग,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ८ जानेवारी,२०१६.

वाचा:- आरोग्य सेवा संचालनालयाचे पत्र क्र संआसे /कक्ष -३/टे-६ /ग्रारुगोवेली मुइवनिवादुरु /९५२४ -२५ / १५. दि. २३/०९/२०१५.

<u>प्रस्तावना :-</u>ग्रामीण रुग्णालय गोवेली जि. ठाणे येथील मुख्य इमारत व अधिकारी /कर्मचारी निवास्थान दुरुस्ती करणे या कामाचे एकुण रु. १,१४,५७,७४० /- (रु. एक कोटी चौदा लक्ष सत्तावन हजार सातशे चाळीस फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक व आराखडे प्रशासकीय मान्यतेसाठी आरोग्य सेवा संचालनालयामार्फत सादर करण्यात आले होते. सदर अंदाजपत्रक व आराखडे सहमतीसाठी व तांत्रिक बाजू तपासण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आले. सदर अंदाजपत्रकाबाबत निवासी इमारतीच्या दुरुस्तींच्या कामाना एकत्रित व अनिवासी इमारतीच्या कामासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता व निवीदा केल्यास काम व्यवस्थित होवू शकेल असे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले आहेत. त्यानुषंगाने संचालनालयाने सादर केलेल्या अंदाजपत्रकातील निवासी इमारतीच्या दुरुस्ती कामांच्या रु. ५४,०६,५०५ (रु. चौपन्न लक्ष सहा हजार पाचशे पाच फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आता या शासन निर्णयान्वये ग्रामीण रुग्णालय गोवेली जि. ठाणे येथील अधिकारी / कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती कामाच्या रु. ५४,०६,५०५ (रु. चौपन्न लक्ष सहा हजार पाचशे पाच फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाचा वाव खालीलप्रमाणे आहे.

क्र.	कामाचे नाव	रक्कम
१	ग्रामीण रुग्णालय गोवेली जि.ठाणे येथील वैद्यकीय अधिक्षक निवासस्थान दुरुस्ती.	रु. ४,४०,२३७/-
२	ग्रामीण रुग्णालय गोवेली जि. ठाणे येथील वैद्यकीय अधिकारी निवासस्थान दुरुस्ती.	रु. ८,३८,४७१/-
३	ग्रामीण रुग्णालय गोवेली जि. ठाणे येथील परिचारीका निवासस्थान दुरुस्ती.	रु. २३,८९,५९३/-
४	ग्रामीण रुग्णालय गोवेली जि. ठाणे येथील वर्ग-४ कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती.	रु. १७,३८,२०४/-
	एकुण	रु. ५४,०६,५०५/-

२. सदर काम सुरु करण्यापूर्वी सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबधित प्राधिकारी/ अभियंता यांच्याकडून साक्षांकीत करुन घ्यावे .

३. कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिका-यांची तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक राहील.

४. सदर कामाची स्वतंत्र अंदाजपत्रके सादर करण्यात आली आहेत . तथापि सदर कामांची निवीदा काढताना प्रत्येक कामाची स्वतंत्र निवीदा न काढता प्रस्तावात नमूद कामासाठी एकच निवीदा काढण्यात यावी.

५. ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

सदर बांधकामावरील खर्च खालील लेखाशिर्षाखाली उपलब्ध अनुदानातुन भागविण्यात यावा.

लेखाशिर्ष

४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

०२- ग्रामीण आरोग्य सेवा ०४ सार्वजनिक आरोग्य

१०४ - सामुहीक आरोग्य केंद्र

(००) (०१)- मोठी बांधकामे

(४२१० ०३९१)

५३ - मोठी बांधकामे.

सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४७५/१५/इमा-३ दि. ०४/१२/२०१५ अन्वये प्राप्त सहमतीने व वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक - विअप्र २०१५/प्रक्र-३०/२०१३/विनीयम-भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्ट भाग - पहिला उपविभाग - पाच मधील अनु.क्र-१ परिच्छेद क्र. १३४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१६०१०८११५३१६६७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shubha Anil Gadre

Digitally signed by Shubha Anil Gadre
DN: CN = Shubha Anil Gadre, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.08 15:19:40 +05'30'

(शु.अ.गद्रे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक , आरोग्य सेवा, मुंबई

२. सह. संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये- राज्यस्तर .) मुंबई.

३. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे .

४. जिल्हा शल्य चिकीत्सक , ठाणे .

५. वैद्यकीय अधिक्षक , ग्रामीण रुग्णालय , गोवेली जि. ठाणे .

६. कार्यकारी अभियंता , ठाणे बांधकाम विभाग ,ठाणे .

७. महालेखापाल १/२ महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपुर.

८. वित्त विभाग (विनीयम कार्यासन/कोषा-५/अर्थसंकल्प) मुंबई.

९. अवर सचिव (अर्थसंकल्प) सार्वजनिक आरोग्य विभाग , मंत्रालय मुंबई.

१०. निवडनस्ती.